डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाचे लोकार्पण

पनवेल : पनवेल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाचे केंद्र बनेल. या भवनाची निर्मिती आ. प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्याचे फलित आहे, असे गौरवोद्‍गार उपमुख्यमंत्री आणि समारंभाचे उद्‍घाटक अजित पवार यांनी काढले. पनवेल नगरपालिकेने बांधलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाचा लोकार्पण सोहळा गुरुवारी (दि. २७) येथे झाला. त्या वेळी ते बोलत होते.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक न्याय मंत्री शिवाजीराव मोघे होते. जलसंपदा मंत्री सुनील तटकरे, माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सिडको अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, ओबीसी आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष वसंतराव ओसवाल, जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष आर. सी. घरत, माजी मंत्री रवीशेठ पाटील, आ. प्रशांत ठाकूर, अनिल तटकरे, नगराध्यक्षा चारुशीला घरत, कामगार नेते श्याम म्हात्रे यांच्यासह जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष सुदाम पाटील, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, कॉंग्रेसच्या जिल्हा मागास सेलचे अध्यक्ष प्रकाश बिनेदार, महिला बालकल्याण सभापती नीता माळी, तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, सतीश पाटील, भीमसेन माळी, कनिष्क कांबळे, प्रवीण शिंदे, नगरसेवक शिवदास कांबळे, जयंत पगडे, अनिल भगत, राजू सोनी, गणेश पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.

आज मराठी भाषा दिन आणि महाशिवरात्री आहे. अत्यंत चांगला दिवस भवनाच्या उद्धाटनाला निवडला. या भवनातून दलित बांधवाच्या प्रश्नावर विचार मंथन झाले पाहिजे. ज्या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी गेल्या असतील त्यांचे पहिले पुर्नवसन झाले पाहिजे त्यांना बाजारभावाप्रमाणे पैसे दिले पाहिजे. तसेच त्यांचे प्रश्नही तातडीने सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शहराचा विकास झपाट्याने वाढत असून भविष्यातील पिण्याच्या पाण्याची समस्या लवकरच सोडविली जाईल. आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे या भागाचा विकास मोठ्या प्रमाणावर होईल.

आपल्या प्रमुख भाषणात उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, पनवेल नगरपालिकेने तयार केलेले डॉ .बाबासाहेब आंबेडकर भवन सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाचे केंद्र ठरेल. हे भवन बाबासाहेबांच्या विचारांचे आणि आशा आंकाक्षेच्या प्रतीक ठरावे. बाबासाहेबांचे विचार आणि कार्य या केंद्रातून दूरपर्यंत पोहोचतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पनवेलच्या नागरिकांनी प्रशांत ठाकूर यांना संधी दिली, त्यांनी या संधीचा योग्य उपयोग केला. त्यांच्यामुळेच पनवेलचा झपाट्याने विकास होत असल्याचे आपण पहात आहोत. राज्यातील कॉंग्रेस आघाडी सरकार सर्वधर्म समभाव ही भूमिका रूजवत आहे. वाढवत आहे. त्यासोबत राज्याचा सर्वांगिण विकासही आम्ही करत आहोत, असेही ते म्हणाले.

दिवंगत मुख्यमंत्री आणि कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते विलासराव देशमुख यांचे स्मरण यानिमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. ते म्हणाले की, एखाद्या भूखंडाचे आरक्षण बदलणे फार कठीण गोष्ट आहे परंतु आ. प्रशांत ठाकूर यांनी सातत्याने पाठपुरावा करून त्या काळी विलासरावांकडून भूखंडाचे आरक्षण बदलून घेतले. त्यामुळेच या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन साकारण्यात आले आहे. प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळेच या भवनाच्या उद्‍घाटनाला आम्हाला येता आले, असेही ते म्हणाले. पनवेल नगरपालिका आणि आ. प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे आंबेडकर भवनाची दिमाखदार वास्तू उभारली गेली आहे. या वास्तूंच्या उभारणीत ज्यांचा ज्यांचा हात आहे, त्या सर्वांचे अभिनंदन पवार यांनी भाषणातून केले.

पनवेल शहर झपाट्याने विकसित होत आहे. या शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या देहरंग धरणाचा गाळ काढणे, गाढी नदी स्वच्छ करणे, ही कामे केली जातील. पनवेलच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

आ. प्रशांत ठाकूर आणि पनवेल नगरपालिकेने उभारलेले भव्य दिव्य स्वरूपाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन हे बहुजनांसाठी हक्काचे व्यासपीठ आहे. या व्यासपीठाचा उपयोग पूर्णपणे करत येथे बाबासाहेबांचे विचार रुजविण्यासाठी चर्चा आणि बैठका झाल्या पाहिजेत. या भवनातून सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाचे विचार बाहेर पडू द्या. आ. प्रशांत ठाकूर आणि पनवेल नगरपलिका तसेच विविध संस्था, संघटना या सर्वांचा हातभार लागल्यामुळेच आंबेडकर भवन पूर्ण झाले आहे, असा पुनरुच्चार पवार यांनी आपल्या भाषणाच्या सरतेशेवटी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा रुजवा : तटकरे

पनवेल नगरपालिका आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या योगदानातून भव्यदिव्य स्वरुपाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारले गेले आहे. या भवनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा रुजवा, असे प्रतिपादन जलसंपदा आणि जिल्ह्याचे पालकमंत्री सुनील तटकरे यांनी केले आहे. तटकरे पुढे म्हणाले की, या देशाला बाबासाहेबांनी फार मोठे योगदान दिले आहे. आम्हाला त्याचा अभिमान आहे. सामाजिक समतेचा विचार बाबासाहेबांनीच रायगडात रुजवला. श्री. तटकरे पुढे म्हणाले, या भवनाच्या भूमिपूजन समारंभाला मी होतो आणि उद्‍घाटनालाही मला उपस्थित राहता आले ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची बाब आहे.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी खुप मोठे योगदान दिलेले आहे. सर्व सामान्य जनतेची व शोषितांच्या समस्या प्रखरतेने मांडल्या व तळागाळातील जनतेला न्याय दिला आहे. एमएमआरडीकडून मोठ्या प्रमाणात निधी पनवेल नगरपारिषदेला मिळण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पनवेल शहर मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. विशेष बाब म्हणून या शहराला उड्डाणपुलाची मान्यता देण्यात आली. पनवेलच्या विकासासाठी प्रस्ताव द्या, विशेष निधी नक्की मिळेल, असे आश्वासनही त्यांनी दिले. विकसित होत असलेल्या या शहराचे अनेक प्रश्न आहेत, त्याचप्रमाणे सिडकोचे प्रलंबित प्रश्न सोडायचे आहेत. पनवेल आणि उरणसाठी कालबध्द नियोजनाची गरज असून, त्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही तटकरे यांनी या वेळी दिली.

पनवेल नगरपालिकेने बांधलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उत्तम आहे. या भवनात अभ्यासिका आहे. या भवनाच्या माध्यमातून लोकांना बाबासाहेबांची विचारधारा कळावी, या विचारांनी प्रभावीत होऊन या ठिकाणी वेगवेगळे उपक्रम राबविले जावेत, अशी सूचनाही तटकरे यांनी आपल्या भाषणात केली.

सामाजिक न्याय मंत्री शिवाजीराव मोघे म्हणाले की, आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेलच्या नगराध्यक्षा चारुशीला घरत यांनी दिमाखदार वास्तूची निर्मिती केली आहे. त्यांना मी धन्यवाद देतो. एखाद्या भूखंडाचे आरक्षण काढणे कठीण काम आहे, पण ते आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठपुरावा केल्यामुळे बदलण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर यांची मूर्ती लहान असली तरी किर्ती महान आहे. त्यांनी हे दिमाखदार भवन उभारून आदर्श काम केले आहे. त्यांना माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचे मार्गदर्शनस लाभले असल्याचेही ते म्हणाले.

त्यामुळे या ठिकाणी हे सुंदर भवन निर्माण करता आले आहे. राज्य सरकारने मागासवर्गीयांसाठी विविध धोरणे निश्चित केली आहे. ती राबविण्यात येत आहेत. त्याचा अपेक्षित परिणाम दिसत असल्याचे ते म्हणाले.

सर्वांच्या मेहनतीचे फळ

पनवेल नगरपालिकेच्या माध्यमातून भव स्वरुपात उभारण्यात आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सर्वांच्याच मेहनतीचे फळ आहे. रेटा लावून बहुजनांचे स्वप्न पूर्ण केले त्याबद्दल आभार आणि अभिनंद असे उद्‍गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी काढले.

आंबेडकर भवनाच्या उभारणीचा आढावा घेताना आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, विविध संस्था, संघटना, दलित आणि बहुजनांची आंबेडकर भवनाची सातत्याने मागणी होती. ज्या भूखंडावर भवन निर्माण करायचे होते, त्या ठिकाणी आरक्षण होते. हे आरक्षण बदलण्यास चार वर्षे लागली. दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी अवघ्या एका दिवसात या भूखंडाचे आरक्षण बदलून दिल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्याचा मार्ग मोकळा झाला, असे ते म्हणाले. हे भवन सामाजिक सुधारणा आणि चळवळीचे केंद्र बनले पाहिजे. भावी पिढीसाठी या भवनाचा उपयोग व्हायला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

पनवेलच्या विकासकामांना स्पर्श करीत आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, शहर परिसरात विविध स्वरुपाची विकासकामे सुरू आहेत. ती वेगाने पूर्ण करण्यात येतील.

बहुजनांचे स्वप्न पूर्ण केले

पनवेल शहरात आंबेडकर भवन असावे, अशी मागणी बहुजनांकडून करण्यात येत होती ते स्वप्न पनवेल नगरपालिका आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी पूर्ण केले असे गौरवोदगार माजी मंत्री आणि आमदार चंद्रकांत हंडोरे यांनी काढले. या भवनाच्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचार जनतेत पोहोचले पाहिजेत. शहरात इतरही विकासकामे सुरू आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलचा चेहरामोहरा बदूल टाकला आहे, असेही ते म्हणाले.

कॉंग्रेस आघाडी सरकार दलितांच्या विकासासाठी कटिबध्द असून, विविध योजना राबविल्या जात आहेत त्याचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी आपल्या भाषणात केले.

समारंभाच्या सुरुवातीला नगराध्यक्षा चारुशिला घरत यांनी शहरातील विविध विकास कामांचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुनील पाटील यांनी केले.